2
24/02/2025


# महाराष्ट्र शासन

## आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

राज्य उत्पादन शुल्क भवन, महानगरपालिका सभागृह मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

Email: jcam.excise@maharashtra.gov.in


प्रति,

१. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (मार्फत- संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क)
४. सर्व आसवनी प्रभारी अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क
५. सर्व नमुना-I व डीएस-१ अनुज्ञप्तीधारक ( **मार्फत**- संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क )

क्रमांक. डीवायएस ११२०१६/९२९९-ए/चार (भाग-२) मुंबई,दि.२१ फेब्रुवारी,२०२५.

**विषय** : वाहनांच्या इंधनात मिश्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या इथेनॉलचे विप्रकृतीकरण करतांना वापरावयाच्या विप्रकृत पदार्थाबाबत...

**संदर्भ** : १. या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक ,दि.१८.०२.२०२५.
२. वेस्ट इंडिया शुगर मिल्स असोसिएशन, पुणे यांचे पत्र क्र. विस्मा /अध्यक्ष / इथेनॉल -विप्रकृत/ २१०/२०२४-२५, दि.२०.०२.२०२५.
३. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मर्यादित, मुंबई यांचे पत्र क्र. सासं / वाणिज्य / इथेनॉल /६४१/२०२४-२५, दि.२१.०२.२०२५.
४. द इथेनॉल मैन्युफ़ैक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबई यांचे पत्र क्र.एम.ए.आय/५०/२०२४ -२५, दि.२१.०२.२०२५.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, संदर्भिय क्र.१ वरील परिपत्रकान्वये वाहनांच्या इंधनामध्ये इथेनॉलमध्ये वापरण्यात येणारे क्रोटोनाल्डिहाईड (Crotonaldehyde) हा विप्रकृत पदार्थास पर्यायी विप्रकृत पदार्थ वापरण्याबाबत परिपत्रक जारी करण्यात आले आहे. याबाबत संदर्भिय क्र. २, ३ व ४ अन्वये अनुक्रमे वेस्ट इंडिया शुगर मिल्स असोसिएशन, पुणे, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मर्यादित, मुंबई व द इथेनॉल मैन्युफ़ैक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबई यांनी सादर केलेली निवेदने व सदर संस्थांच्या सभासदांची निकड विचारात घेऊन तसेच राज्यातून होणाऱ्या इथेनॉल पुरवठ्यावर विपरीत परिणाम होऊ नये, याकरिता उपरोक्त संदर्भिय क्र.१ वरील परिपत्रकीय सूचनांमधील क्रोटोनाल्डिहाईडच्या (Crotonaldehyde) विप्रकृत मद्यार्कातील वापरास प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यास पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे. परिपत्रकामधील इतर सुचनांची अंमलबजावणी तशीच सुरू ठेवण्यात यावी. सर्वांनी परिपत्रकांतील सुचनांची काटेकोर पालन करण्याची दक्षता घ्यावी .

<u>मा.आयुक्तांच्या मान्यतेने.</u>

21/2/25

( विश्वनाथ इंदिसे )
सह आयुक्त,( मळी व मद्यार्क )
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत,**

१. कार्यासन क्र. ५,९, ११ व १२ आयुक्तालय,
२. कार्यासन क्र.८ ( या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याकरीता )